पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 19/02/2020 (बुधवार)
(सायंकाळ)

---

## चोरी

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर कळमेश्वर बसस्टॉप येथे दिनांक 18/02/2020 चे 16.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. प्रभा बळवतराव चांभारे, वय 51 वर्ष, रा. घोराड कळमेश्वर या वरून घोराड कडे जात होत्या. दरम्यान कळमेश्वर बसस्टॉप जवळ अज्ञात आरोपीने फिर्यादींच्या जवळील पर्स चोरून नेला. त्या पर्समध्ये सोन्याचे मंगळसुत्र कि. 36, 000/–रू. व सोन्याच्या 2 अंगढया कि 8,000/–रू. व नगदी 2,000/–रू. असा एकुण 46,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार गवई 9860889550 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. सावनेर :–अंतर्गत 02 कि.मी. सावनेर ते काटोल रोड अंबिका ढाब्याच्या समोर येथे दिनांक 18/02/2020 चे 20:00 वा. दरम्यान मृतक/आरोपी – शुभम गंगाधरजी सातपुते, वय 25 वर्ष, रा. सावंगी हा त्याच्या एम.एच–40/बीएन–4837 क्रमांकाच्या मोटरसायकलने सावनेर – काटोल मार्गाने जात होता. दरम्यान आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवीत असताना सावनेर – काटोल मार्गातील अंबिका ढाब्याच्या समोरील सिमेंट पोलला आरोपीने धडक दिली. या अपघातात आरोपी हा स्वतः मरणास कारणीभुत ठरला. .

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रविंद्र मधुकर सातपुते, वय 33 वर्ष, रा. सावंगी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री. कारंडे 7722011228 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर